# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय रामनगर सृष्टी,

मिरारोड पुर्व, जि. ठाणे दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१

E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्र-१०४ दिनांक - २१/०३/२०२४

## जबरी चोरीच्या गुन्हयात ०५ वर्षांपासून फरार आरोपीस अटक करण्यात काशिगांव पोलीसांना यश

फिर्यादी श्रीमती. रिटाबेन योगेशकुमार पटेल, व्यवसाय- गृहिणी, रा. आरती पॅलेस, स्वामी नारायण मंदिर जवळ, अहमदाबाद, राज्य गुजरात यांचे पती श्री. योगेश कुमार यांना आरोपी १. मुबारक अली कमजुमा खान, २. अंकुश अनिलभाई अगरवाल, ३. लल्लु यांनी फाऊटन हॉटेल येथे बोलावून त्यांना मारहाण करुन त्यांचे ताब्यातील ६०,०००/- रु. रोख रक्कम, पॅन कार्ड, आधार कार्ड जबरदस्तीने काढून घेतले म्हणून फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन काशिमिरा पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि. क्र. ३२९/२०१९, भादंविसं कलम ३६४ अ, ३६५, ३९४, ३२५, ३२६, ३२३, ३४ प्रमाणे दि. १३/०३/२०१९ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर नमुद गुन्हा दाखल झाले नंतर गुन्हयाचा प्राथमिक तपास पोलीस उप-निरीक्षक, आनंद. ए. भगत यांनी करुन त्यांनी दि. २१/०६/२०१९ रोजी आरोपी नामे १. मुबारक अली कमजुमा खान, वय ४८ वर्ष, रा सी/७०४, रिजवान अपार्टमेन्ट, बोरिवली, जोगेश्वरी, मुंबई व दि. ३१/०७/२०१९ रोजी १२.२२ वा. आरोपी २. अंकुश अनिलभाई अगरवाल, वय २४ वर्ष, रा.शितल सोसायटी, गांधी चौक नवापुर, नंदुरबार यांस मुद्देमालासह अटक करण्यात आली होती.

गुन्हयातील पाहिजे आरोपी लल्लु हा गेले ०५ वर्षापासून स्वतःचे अस्तित्व लपवून रहात असल्याने मिळून आलेला नव्हता.

दि. १४/०३/२०२४ मा.पोली आयुक्त श्री.मधुकर पाण्डेय सो यांच्या प्रेरणेने नवनिर्मीत काशिगांव पोलीस ठाणे कार्यान्वीत झाल्यानंतर, पोलीस ठाणे अभिलेखावरील पाहिजे आरोपीतांची विभागणी करुन, त्यांचा शोध सुरु करण्यात आला होता. सदरचा गुन्हा हा गंभीर स्वरुपाचा असल्याने मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ- ०१, श्री. प्रकाश गायकवाड यांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे राबविण्यात येत असलेल्या ऑल आऊट ऑपरेशन दरम्यान, सदर गुन्हयातील पाहिजे आरोपीताचा शोध घेत असतांना, यातील नमूद पाहिजे आरोपी नामे लल्लु हा निलकमल नाका बाजारात असल्याची खात्रीलायक बातमी गुप्त बातमीदार मार्फत प्राप्त झाली. सदर बातमीची खातरजमा करण्यासाठी गुन्हे प्रकटीकरण पथकाने सदर परीसरात शोध घेतला असता, एक इसम संशयास्पदरित्या फिरताना मिळून आल्याने, त्यास पोलीस पथकाने हटकून, त्याच्याकडे चौकशी केली असता, तो पळून जावू लागल्याने, त्याचा पाठलाग करुन, त्यास ताब्यात घेवून पोलीस ठाण्यास आणून, त्याचेकडे विचारुन चौकशी केली असता, त्याचे नांव सत्यनारायण राम कैलास पाल ऊर्फ लल्लु वय ४४ वर्ष, व्यवसाय ट्रान्सपोर्ट, रा रु.नं ०७, पखंदा आर.डी.रोड, बमन की पाडा जवळ, ओवळा, ता.जि.ठाणे असे असून, तो वर नमूद गुन्हयातील पाहिजे आरोपी असल्याचे समजून आले. त्याच्याबाबत त्याचेकडे अधिक चौकशी करता त्याने सदरचा गुन्हा करुन, गेली पाच वर्षे तो स्वतःचे अस्तित्व लपवून पोलीसांपासून लपून राहत होता, सदर गुन्हयातील पाहिजे आरोपी असल्याचे निष्पन्न झाल्याने, त्यास नमूद गुन्हयात अटक करण्यात आले आहे.

सदरची कामगिरी मि.भा.व.वि पोलीस आयुक्तालय, मा.पोली आयुक्त श्री.मधुकर पाण्डेय मा. अपर पोलीस आयुक्त, श्री. श्रीकांत पाठक, मा. पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ- ०१, श्री. प्रकाश गायकवाड, मा. सहा. पो. आयुक्त, मिरारोड विभाग, डॉ. विजय मराठे, यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक, राहुलकुमार पाटील, काशिगांव पोलीस ठाणे, सपोनि/माणिक पाटील, पोउनि/किरण बघदाणे, सहा.फौज/ ओमप्रकाश पाटील, पो.हवा. राहुल वांळुज, पो.अं. प्रविण टोबरे, उमंग चौधरी, किरण विरकर यांनी केलेली आहे.